दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ८० वा | मंगळवार ०६ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 80 | Date : 06/08/2024 | blow Tuesday | Page 4 | Price 4

गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८




## संपादकीय

### अशी अपेक्षा आहे.

संसदेबाहेरही मोदी सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर विविध घटकांकडून चौफेर आक्षेप घेतले जात आहेत. अर्थसंकल्पातील काही तरतुदी तर्कसंगत नाहीत, देशातील मध्यमवर्गावरील बोजा कमी करण्यात या अर्थसंकल्पात कोणत्याही ठोस तरतुदी नाहीत. राज्यांना मदत देण्याबाबत भेदभावाची नीती अवलंबली गेली आहे, अशा स्वरूपाचे आक्षेप विरोधी पक्षाच्या नेत्यांनी नोंदवले आहेत. निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प सादर करताना जो देखावा केला होता, त्याचा पर्दाफाश विरोधकांकडून लोकसभेत केला जात आहे. त्यामुळे सरकारलाही त्यांना तोंड देणे अवघड दिसत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. याच अनुषंगाने विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही सरकारला धारेवर धरत अर्थसंकल्पावर जोरदार आक्षेप नोंदवला आहे. राहुल विरोधी पक्षनेते झाल्यापासून त्यांचा संसदेतील परफॉर्मन्स चांगलाच सुधारला असल्याचे जाणवत आहे. केवळ बेदरकार टीका करण्यापेक्षा आपल्या आक्षेपांवरील तर्कही ते तपशिलाने सादर करीत आहेत. त्याचा अनुभव त्यांच्या अलीकडील भाषणात आला. या सरकारने कमळाच्या आकाराचा चक्रव्यूह रचला असून महाभारतात जसे सहा जणांनी चक्रव्यूह रचून अभिमन्यूची हत्या केली, तसाच चक्रव्यूह मोदी सरकारने रचला असून त्याच्या केंद्रस्थानी मोदी, अमित शहा, मोहन भागत, अजित डोवाल, अदानी आणि अंबानी हे आहेत, असे हूल यांनी नमूद केले. देशातले सर्वच घटक आज अडचणीत आल्याचा घणाघातही त्यांनी केल्याचे ऐकायला आले. केवळ राहुल गांधीच नव्हे तर इंडिया आघाडीतील अन्य घटक पक्षांचे सभासदही मुद्देसूद म्हणणे मांडून आपली व्यथा मांडत आहेत. मोदी सरकारची एकूण आर्थिक नीती आणि अर्थसंकल्प यावर घेण्यात आलेल्या या रास्त आक्षेपांना आता अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून तितकीच रास्त उत्तरे अपेक्षित आहेत. कांदा महाग झाल्यावर संसदेत झालेल्या चर्चेला उत्तरदेताना, 'मैं लहसुन, प्याज खाती नहीं' अशा छापाची उत्तरे देऊन त्यांनी वेळ मारून नेण्याने देशाचे भले होणार नाही. रुपया गडगडत असताना, 'रुपया गडगडत नाही तर डॉलर मजबूत होत आहे' अशा स्वरूपाची भंपक विधानेही त्यांच्याकडून पुन्हा केली जाणार नाहीत अशी अपेक्षा आहे. शेवटी केंद्रातील सरकार हे संपूर्ण देशाच्या हिताचे रक्षण करणारे सरकार असते, पक्षीय भेदभाव करणाऱ्या आर्थिक तरतुदीतून देशाचेच नुकसान होत असते, याचीही जाणीव अर्थमंत्र्यांनी ठेवणे अपेक्षित आहे. याची नोंद त्या अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना घेतील, अशी अपेक्षा आहे.

## बैलगाडा शर्यतीची संस्कृती जपणारा अवलिया : सागर दादा कल्याणशेट्टी



नोव्हेंबर २०१५ ला हन्नूर ग्रामपंचायतची निवडणूक लागली. अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी. सरपंच पद हे आरक्षित झाले. निवडणूक तशी चुरशीचीच लागली. हनूर गावामध्ये विखुरलेल्या एकत्र नेत्यांनी. तिसरी आघाडी स्थापन करून. कल्याणशेट्टी गटाला हादरा देण्याचा ठरवलं. तत्कालीन सरपंच सचिन दादा कल्याणशेट्टी होते. अशातलाच. एम ए बी एड शिक्षण घेऊन. तरुणासोबत संघटनात्मक बांधणी करणारा. शिक्षित युवक राजकारणामध्ये प्रवेश केला. तो म्हणजे सागर दादा कल्याणशेट्टी होय. वडील सिद्धेश्वर कल्याणशेट्टी सर माजी प्राचार्य अनंत चैतन्य प्रशाला. त्यांना हन्नूर मधील राजकीय मुत्सद्दी असे त्यांची उपमा. अत्यंत प्रभावी. सरांच्या पावलावरती पाऊल ठेवत राजकीय गणित आखण्याचा विचार केला. शेतीची आवड शेतीला लागणाऱ्या अवजारांची गोळा करणे. त्यातला त्यात अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे बैल जोडी , महाराष्ट्र कर्नाटक राज्यातील कोठेही बैल जोडीचा बाजार भरतो . त्या गावाला जाऊन बैलजोडीची पारख करणे, खरेदी करणे हा आवडीचा छंद. चुरशी च्या लागलेल्या निवडणुकीमध्ये सगळ्या जागा जिंकून विरोधकाचा पाडशा पडला. आणि उपसरपंच पदावर ती विराजमान झाले. मी आमदाराचा भाऊ आहे. मी खूप जबाबदार व्यक्ती आहे. असं कोणताच गर्व मनाशी ठेवला नाही. माझं जे कर्तव्य आहे मला ते पार पाडायचा आहे. प्रत्येक युवकांना आपल्या भावाप्रमाणे वागवणारा हा युवा नेता. अत्यंत तळमळीने समाजकार्याचा वसा पुढे घेऊन जात आहे. शिक्षण महर्षी कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सर, सिद्धेश्वर कल्याणशेट्टी सर, मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचा कार्य या युवा नेत्याच्या हातामध्ये आहे. राजकारणापेक्षा तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण करून आपल्या समाजामध्ये असणारी संस्कृती म्हणजे बैलगाडी शर्यत. परंपरागत चालत आलेल्या संस्कृतीचा जतन करून आपण लोकांपर्यंत बैलगाडीची शर्यतीची. आवड निर्माण केली पाहिजे बैल जोड्या पळविले पाहिजे आणि आपली संस्कृती पळायला पाहिजे. हे धोरण उराशी बाळगून. बंदी घातलेल्या बैलगाडी शर्यतीच्या नियमाचा विचार ठेवून बैलगाडी शर्यतीचा शासकीय परवाना काढून हन्नूर गावामध्ये ऐतिहासिक बैलगाडी शर्यत करण्याचा निर्णय घेतला. त्याला हन्नूर केसरी असे नामकरण करण्यात आले. अक्कलकोट तालुक्यातील पहिली बैलगाडी शर्यत सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून झाली. हजारोच्या संख्येने येणाऱ्या श्रोत्यांनी सागर दादांचे अभिनंदन करू लागले. असे आजपर्यंत कधीच घडले नाही. सागर दादांनी करून दाखवले. गेल्या दोन-तीन वर्षापासून ही बैलगाडी शर्यत. मोठ्या थाटाने भरते.आपल्या संस्कृतीचा ठेवा. आपणच पुढे घेऊन गेला पाहिजे. ही भूमिका सागर दादाच्या विचारून दिसते. बैलगाडी शर्यतीच्या संस्कृतीचा जतन करणाऱ्या अवलियाचा म्हणजे सागर दादा कल्याणशेट्टी यांचा आज वाढदिवस त्यांच्या हातून याही पुढे उत्तम कार्य घडत राहो. त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी मनोकामना करतो.

**पत्रकार गौतम बाळशंकर ग्रामपंचायत सदस्य हन्नूर**
**संचालक तेजस्वी अर्थमूव्हर्स हन्नूर**

## एससी एसटी ओबीसी बचाव यात्रेत जास्तीत जास्त संख्येने सामील होण्याचे चिखली तालुका व शहराच्या वतीने आव्हान



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे : आरक्षण बचाव यात्रा महाराष्ट्रात शांतता कायम राहावी यासाठी २५ जुलैपासून काढण्यात आली आहे आरक्षण बच्छाव यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांना पत्र दिली आहे राज्यात अनेक ओबीसी नेत्यांवर हल्ले झाले त्यामुळे ओबीसी समाज सुद्धा प्रचंड घाबरलेला आहे ओबीसींच्या भीती दूर करण्यासाठी १४दिवसांची ही यात्रा आहे. आरक्षण बचाव यात्रेचा ७ आगस्ट रोजी औरंगाबाद येथे जाहीर सभा घेऊन समारोप होणार आहे. ओबीसी आरक्षण वाचले पाहिजे.

एससी एसटी विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे. ओबीसी च्या विद्यार्थ्यांची सुद्धा एस सी एस टी प्रमाणे प्रमाणपत्र शिष्यवृत्ती मिळते ती जशीच्या तशी लागू झाली पाहिजे. एस सी एस टी आणि ओबीसी ला पदोन्नतीत आरक्षण मिळाले पाहिजे

**१००ओबीसी आमदार निवडून आणणे**

५५ लाख बनावट कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यात यावी.हे मुद्दे घेऊन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड बाळासाहेब आंबेडकर यांनी ही यात्रा सुरु केलेली आहे येत्या ६ आगस्ट रोजी ही यात्रा बुलडाणा जिल्ह्यात येणार असून चिखली मध्ये या यात्रेचे मोठ्या जल्लोष्यात विविध एससी एसटी ओबीसी संघटनेंकडून स्वागत होणार आहे. अंबाशी फाटा कोलारा फाटा मेहकर फाटा येथे माँसाहेब जिजाऊ यांच्या

पुतळ्याला अभिवादन करून अशोक वाटिका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ठीक १२:३०वाजता कॉर्नर सभा घेऊन बुलडाणा कडे ही यात्रा जाणार आहे.तरी या यात्रेत आपल्या हक्काच्या लढाई साठी जास्तीत जास्त संख्येने एसटीएससी ओबीसी बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हाहन चिखली तालुका सचिव जितु निकाळजे शहर अध्यक्ष बाळासाहेब भिसे व तालुका शहर पद अधिकारी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## योगासन स्पर्धेत एमआयटी गुरुकुल स्कूल मुलांचा दणदणीत विजय



**दैनिक यशसिध्दि न्यूज**


पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी गुरुकुल स्कूल, पंढरपूर येथे आयोजित केलेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत एमआयटी गुरुकुल स्कूलचा दणदणीत विजय झाला. संघातील मुलांची नावे : १४ वर्षाखालील मुले- शंभुराजे गवळी प्रथम क्रमांक, मयुरेश पवार तृतीय क्रमांक, राजवीर डोंगरे पाचवा क्रमांक.

१७ वर्षाखालील मुली- वाणीश्री अमोल घाडगे तृतीय क्रमांक

१७ वर्षाखालील मुले- शौर्य चौगुले द्वितीय क्रमांक

१९ वर्षाखालील मुली- सिद्धी अनुप सावंत द्वितीय क्रमांक, ईश्वरी गाढवे तृतीय क्रमांक. दीक्षा जाधव चौथा क्रमांक ,१९ वर्षाखालील मुले- मुस्तफा जमादार पाचवा क्रमांक.

रिदमिक योगामध्ये १४ वर्षाखालील मुले- शंभुराजे गवळी प्रथम क्रमांक, १७ वर्षाखालील मुले- शौर्य चौगुले प्रथम क्रमांक, १७ वर्षाखालील मुली- धैर्या बेद्रे द्वितीय क्रमांक, वाणीश्री घाडगे तृतीय क्रमांक, १९ वर्षाखालील मुली- ईश्वरी गाढवे तृतीय क्रमांक, १९ वर्षाखालील मुले- मुस्तफा जमादार प्रथम क्रमांक. विजयी विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक पल्लवी पाटील कविता कटारिया आणि भूषण तायडे यांचे मार्गदर्शन लाभले शाळेचे प्राचार्य शिवाजी गवळी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांना दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेचे माहिती पत्रक आणि मागण्यांचे निवेदन देऊन,मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या कडे पत्रकारांचा विषय मांडावा अशी विनंती करण्यात आली.यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित होते.

## कुंरूद सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी उमेश ठाकरे यांची बिनविरोध निवड


**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या व १५ गावांमधील बाराशे शेतकरी सदस्य संख्या असलेल्या कुंरूद गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभापती पदी उमेश ठाकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

विद्यमान सभापती विजय पाटील यांनी आपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार निवडणूक अध्यासी अधीकारी एल. व्ही. भेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा कुंरूद येथील सोसायटीच्या सभागृहात ३ऑगस्ट रोजी घेण्यात आली यावेळी सभापती पदासाठी उमेश नामदेव ठाकरे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.यावेळी सोसायटीचे १७ पैकी १४ संचालक उपस्थित होते. तर सोसायटीचे विद्यमान संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील कुंरूद सोसायटीच्या उपसभापती जयश्री पाटील, संचालक दयानंद पाटील, विलास पाटील, भगवान सांबरे साईनाथ पाटील, मोहन शेलार, महेंद्र पाटील, रोहीदास शेलार, विनोद पाटील, मदन मिरकुटे, यांनी उपस्थित राहून ठाकरे यांचे अभिनंदन केले.तर निवडणूक दरम्यान सचीव म्हणून आदेश जाधव यांनी काम पाहिले.



## रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन, रेणापूर येथे पालक मेळावा संपन्न




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

रेणापूर/सुधाकर रणदिवे : २-८-२०२४ रोजी रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन,रेणापूर येथे पालक मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शंकरराव गुट्टे महाविद्यालय,धर्मापुरी येथील प्रा. डॉ. पांडुरंग मामडगे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कैलास मोटे हे उपस्थित होते.यावेळी प्रा शशिकांत चिलरगे ,डॉ शेटकर हिरकन ,प्रा उमेश रणदिवे ,प्रा रतन लहाने ,प्रा रमाकांत गायकवाड ,राधिका माने मॅडम,मनीषा लातूरकर , प्रा.उत्तम दुधभाते, प्रा.तक्षशिला जावळे, प्रा.भगवान अंकुश, चंद्रकांत आडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापिका कु .तय्यबा शेख यांनी केले प्रास्ताविक डॉ.हिरकण शेटकर यांनी तर आभार प्रदर्शन कु.गिताश्री कलमे यांनी केले.

## स्वेरीच्या प्रा. मिनल भोरे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पुणे येथील ए.आय.एस.एस.एम.एस. व्यवस्थापन संस्थेमध्ये स्वेरीच्या एमबीए विभागात प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. मिनल मारुती भोरे यांनी पुणे जिल्ह्यातील 'फास्ट मूव्हिंग हेल्थ गुड्स (एफ.एम.एच.जी.) कंपन्यांनी अवलंबलेल्या विपणन रणनीतींचा अभ्यास' या विषयावर शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च असणारी पीएच. डी. पदवी संपादन केली असून या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीच्या प्रा. मिनल भोरे यांना ए.आय.एस.एस.एम.एस. या व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. अभिजित आर. मंचरकर यांनी मुख्य मार्गदर्शन केले आहे. डॉ. मिनल भोरे यांचे संशोधन हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेतून करण्यात आले असून त्यांचा




'विपणन व्यवस्थापन' हा मुख्य विषय होता. सध्या डॉ. मिनल भोरे ह्या गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या एम.बी.ए विभागात गेल्या १५ वर्षांपासुन प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. डॉ. मिनल भोरे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा जवळपास ३५ परिषदांमध्ये सहभाग घेवून आपले शोध पेपर सादर केले आहेत. तसेच ५ पेपर प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या संशोधनामुळे 'फास्ट मूव्हिंग हेल्थ गुड्स' कंपन्यांना 'विपणन' क्षेत्रात नवीन दृष्टिकोन आणि धोरणांची माहिती मिळेल आणि या क्षेत्रातील व्यवसायांना नवीन दिशा मिळणार आहे. डॉ. भोरे यांना स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्यासह इतर प्राध्यापकांचे देखील सहकार्य लाभले आहे. प्रा. मिनल भोरे यांनी पीएच.डी. प्राप्त केल्याबद्दल त्यांचा स्वेरीतर्फे अॅड. धनश्री किरण घाडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, अभियांत्रिकी पदवीच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. मिनल भोरे यांचे अभिनंदन केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble




# मंथन परीक्षेतील गुणवंताचा सन्मान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यात २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या मंथन सामान्य ज्ञान परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा अक्कलकोट येथील पंचायत समिती सभागृहात नुकताच पार पडला. अध्यक्षस्थानी अक्कलकोट तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत अरबाळे साहेब होते तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगार साहेब, पंचायत समिती अक्कलकोटचे कक्ष अधिकारी श्री परिचारक साहेब, सोलापूर आकाशवाणीचे वृत्त निवेदक तथा पत्रकार श्री मारुती बावडे साहेब , मंथन समन्वयिका सौ अश्र्विनी विक्रम जाधव, माजी केंद्रीय मुख्याध्यापक श्री इस्माईल मुर्डी सर, हत्तीकणबस गावचे सरपंच श्री श्रीशैल माळी साहेब, शिक्षक संघटनेचे जिल्हा नेते सैदप्पा कोळी सर,तालुकाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी सर , बसवराज खिलारी सर, शिक्षक नेते श्री दयानंद चव्हाण सर आणि विशेष अतिथी म्हणून अक्कलकोट पोलीस ठाण्यातील कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक श्री सुशील कुमार पाखरे साहेब व श्री रविराज खापरे साहेब उपस्थित होते.

सन २०२३ २४ या शैक्षणिक वर्षात अक्कलकोट तालुक्यातून तीन केंद्रात पहिली ते आठवी वर्गातील एकूण ५३८ विद्यार्थी परीक्षेत बसले होते यात संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या यादीमध्ये १ कु आयत शेख तर अक्कलकोट तालुक्यातून ६५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले.

या सर्व गुणवंतांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन श्री शितल डावरे सर, श्री सुनील राठोड सर, प्रास्ताविक श्री तुकाराम जाधव सर यांनी केले व आभार श्री राजाराम सुरवसे सर यांनी मांडले.

# पाताळेश्वर विद्यालयात आरोग्य तपासणी संपन्न



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : पाताळेश्र्वर माध्यमिक विद्यालयात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र हिवरेचे डॉ. सतीश केदार यांनी विद्यालयातील इ. ५ ते १० पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे प्राथमिक स्वरूपातील आरोग्य तपासणी करून विद्यार्थ्यांना या वयात उदभवणाऱ्या विविध आजारांविषयी माहिती सांगून आपण या ऋतूत दूषित पाण्यापासून, वातावरणातील बदलामुळे होणाऱ्या आजारांना सामोरे जाण्यासाठी आपल्या शरीरात रोगप्रतिकारक शक्ती निर्माण व्हावी म्हणून काळजी घ्यावी. मुलींच्या भेडसावणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय योजना याविषयी मार्गदर्शन केले.. बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. बी. देशमुख यांनी डॉ. केदार यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीतून शालेय विद्यार्थ्यांनी वेळोवेळी होणाऱ्या प्राथमिक रोगांविषयी माहिती घेऊन आपले आरोग्य स्वच्छ व नीटनेटके ठेवावे जेणेकरून आपले मन शाळेत प्रसन्न राहील. आपण जाणीव करून घेऊन वेळीच त्यावर प्रतिबंध करावा व उपाय योजना करून आपले आरोग्य नेहमी सुदृढ ठेवा. आहार, योग्य व्यायाम या गोष्टी शालेय जीवनात अतिशय महत्त्वाच्या आहेत. आपले आरोग्य सुदृढ असेल तर अभ्यासात मन रमते असे सांगितले. यावेळी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे उपशिक्षक टी. के. रेवगडे, बी. आर. चव्हाण, आर. व्ही. निकम,एस. एम. कोटकर, आर. टी. गिरी, सविता देशमुख,सी. बी. शिंदे, के. डी. गांगुर्डे, एस. डी. पाटोळे, आर. एस. ढोली, ए. बी. थोरे उपस्थित होते.*

# पंढरपूर येथील नवजीवन रुग्णालयात मोफत बाल हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: पंढरपूर येथील नवजीवन बाल रुग्णालय मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते

आय एम ए आय ए पी आर बी एस के. आणि पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात यांच्यावतीने या मोफत बाल हृदयरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी नवजीवन बाल रुग्णालयाचे सर्वश्री डॉक्टर शितल शहा प्रमुख पाहुणे प्रांत अधिकारी सचिन इतापे. पुणे येथील सुप्रसिद्ध बाल हृदयरोग तज्ञ डॉक्टर संतोष जोशी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर एकनाथ बोधले उपजिल्हा रुग्णालय प्रमुख डॉक्टर महेश सूडके आदी मान्यवर उपस्थित होते




गेल्या ४० वर्षापासून केवळ लहान मुलांच्या सेवेत देव पाहून आपले सर्वस्व आयुष्य बाल रुग्णाल सेवेसाठी अर्पित केलेले व्रतस्थ व्यक्तिमत्व असणारे डॉक्टर शितल शहा यांनी या शिबिराच्या माध्यमातून २५० पिढीत बालकांची मोफत तपासणी करून समुपदेशन केले सुप्रसिद्ध डॉक्टर संतोष जोशी यांनी शिबिराला आलेल्या बालकांची तपासणी करून पालकांना विशेष सूचना व कोणती काळजी घ्यावयाची याविषयी सविस्तर विवेचन करून सदर केले

प्रमुख पाहुणे म्हणून सचिन इथापे प्रांताधिकारी पंढरपूर डॉक्टर शितल के शहा बालरोगतज्ञ आय एम ए अध्यक्ष डॉक्टर संतोष जोशी बालरोग हृदयरोग तज्ञ डॉक्टर महेश शेळके वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर एकनाथ बोधले तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर रवी आहेर बालरोगतज्ञ डॉक्टर सुधीर आजबे बालरोग तज्ञ डॉक्टर सुखदेव कारंडे बालरोग तज्ञ अभिजीत पाटील बोलतज्ञ डॉक्टर गजानन बागल स्त्री रोग तज्ञ डॉक्टर प्रशांत निकम कन्सल्टंट अर्थ पेदिक अँड जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन इत्यादी कर्मचारी व डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# उजनी धरणातून १ लाख २५ हजार तर वीरमधून ३३ हजार ६०९ क्युसेकचा विसर्ग

## नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : उजनी धरण व वीर पाणलोट क्षेत्रात सतत सुरु असलेल्या पावसामूळे धरणे शंभर टक्के भरली आहेत. त्यामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. उजनी धरणातून सायं.५.०० वाजता १ लाख २५ हजार क्युसेकचा तर वीरधरणातून ३३ हजार ६०९ क्युसेकचा विसर्ग सुरु आहे. संगम येथून दुपारी ३.०० वाजेपर्यंत १ लाख ३७ हजार ८६० क्युसेक पाणी भीमा नदीत मिसळत असल्याने भीमा नदी पात्राच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.

भीमा नदी पात्रातील वाढती पाणी पातळी लक्षात घेता नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

मागील काही दिवसांपासून उजनी व वीर धरण क्षेत्र परिसरात सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. नदी पात्रातील पाणी पातळीत वाढ झाल्याने दगडी पूल तसेच नदीवरील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर,मुंढेवाडी, पूळूज हे ६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. चंद्रभागा नदी पात्रात सध्या ५९ हजार २२२ क्युसेक पाणी वहात आहे. संगम येथून येणाऱ्या पाण्यामुळे चंद्रभागा नदी पात्रात रात्री ८.०० वाजले नंतर सुमारे १ लाख ३७ हजार क्युसेकने पाणी वाहणार आहे. भीमा नदीवरील पंढरपूर तालूक्यातील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर,मुंढेवाडी, पूळूज हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाण्याखाली गेल्याने बंधाऱ्यावरुन होणारी वाहतूक बंद राहणार आहे.चंद्रभागा दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कता बाळगावी. नदीपात्रात कोणीही उतरु नये. स्थानिक ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, तलाठी, मंडलअधिकारी, पोलीस पाटील पुरस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. नागरिकांनी काळजी घ्यावी. प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहनही उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

भीमा नदीपात्रात १ लाख ३० हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४३.६०० पाणी पातळी मीटर) नदीकाठी असणाऱ्या व्यास नारायण झोपडपट्टीमध्ये पाणी शिरते. १ लाख ६० हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४४.५०० पाणी पातळी मीटर) गोपाळपूर येथील नवीन पुलावर पाणी येते. तर २ लाख क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४५.५०० पाणी पातळी मीटर) संतपेठ झोपडपट्टीतील सखल भागात पाणी येते. तर २ लाख २५ हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४६.३०० पाणी पातळी मीटर) गोविंदपुरा येथे पाणी येते. ३ क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४७.८५० पाणी पातळी मीटर) कबीर मठ पायथा, जुनी नगरपालिका इमारत या ठिकाणी सुमारे १ ते १.५ फुट पाणी येते. ३ लाख २५ हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४८.२०० पाणी पातळी मीटर) दत्तघाट, माहेश्र्वरी धर्मशाळा, महाव्दार घाट, कालिका मंदिर चौक या भागात सुमारे १ फुट पाणी येण्यास सुरुवात होते. असे भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस.के हरसुरे यांनी सांगितले तसेच वाढता विसर्ग पाहता नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# मंगळवेढा उपसा सिंचन योजनेची चित्रफीत पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रदर्शित




**या योजनेसाठी आम्ही खूप पाठपुरावा केला मतदानावर बहिष्कार टाकला गावे बंद केली दिवंगत आमदार भारत नाना भालके यांनी यामध्ये लक्ष घालून योजनेची पायाभरणी केली होती मात्र त्यांचा जाण्याने पुन्हा आम्ही खचलो होतो मात्र आमदार समाधान आवताडे यांनी प्रयत्न करून या योजनेची प्रत्यक्षात मुहूर्तमेढ रोवली व मृगजळ वाटणारी योजना प्रत्यक्षात भूमिपूजनापर्यंत आणली आहे लवकरच आमच्या शेतात पाणी दिसेल असं आता वाटू लागला आहे –पांडुरंग चौगुले शेतकरी भाळवणी**

**ही उपसा सिंचन योजना व्हावी यासाठी अनेक आंदोलने झाली येथील गावांनी आम्हाला कर्नाटकात जोडा अशी ही मागणी केली जनरेटा व लोकप्रतिनिधींची ताकत यामुळे ही योजना लवकरच पूर्णत्वास जाईल अशी आशा आहे ही योजना मंजूर झाल्याने ओसाड पडलेल्या माळरानावर शेतकऱ्यांना लवकरच हिरवळ पहावयास मिळेल.– अंकुश पडवळे कृषिभूषण शेतकरी**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवेढा/प्रतिनिधी: तालुक्यातील ऐतिहासिक मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या कामाचा शुभारंभ लवकरच करण्यात येणार असून या योजनेच्या माहितीची चित्रफीत पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते सोलापूर येथे प्रदर्शित करण्यात आली यावेळी आमदार समाधान आवताडे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील आमदार रणजितसिह मोहिते पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद ,मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे,अधीक्षक अभियंता बगाडे, कार्यकारी अभियंता नारायण जोशी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर अंकुश पडवळे पांडुरंग चौगुले यांचेसह २४ गावातील पदाधिकारी उपस्थित होते.

मंगळवेढा तालुक्यातील २४ गावच्या उपसा सिंचन योजनेच्या कामाला मंजुरी मिळवण्याचा ऐतिहासिक निर्णय समाधान आवताडे यांनी पाठपुरावा करून घेतला असून त्यांच्या या प्रयत्नामुळे तालुक्यातील शेतकरी शेतात लवकरच पाणी पाहणार आहेत, लवकरच या योजनेचे भूमिपूजन करण्यात येणार असून प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल असे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले .ही चित्रफीत प्रदर्शित करताना यामध्ये योजनेची पूर्ण माहिती दर्शविण्यात आली आहे या योजनेचा एकूण खर्च ६९७ कोटी ७१ लाख रुपये येणार असून १७,१८७ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे तीन पंपग्रहाद्वारे पाणी उचलण्यात येणार असून पहिला टप्पा गुंजेगाव, दुसरा टप्पा लक्ष्मी दहिवडी व तिसरा टप्पा गोणेवाडी असे तीन ठिकाणाहून प्रत्येकी चार पंपाद्वारे पाणी उचलण्यात येणार आहे यामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये लक्ष्मी दहिवडी,शेलेवाडी व आंधळगाव येथील निम्मा परिसर ओलिताखाली येणार आहे.दुसऱ्या टप्प्यामध्ये उर्वरित आंधळगाव,लेंडवे चिंचाळे,खुपसंगी, गोणेवाडी या गावांना पाण्याचा लाभ मिळणार आहे तर तिसऱ्या टप्प्यांमध्ये जुनोनी,पाटकळ, खडकी,मेटकरवाडी, नंदेश्र्वर, रड्डे,भोसे, सिद्धनकेरी, निंबोणी, जित्ती,खवे, तळसंगी, यड्राव, भाळवणी, जालिहाल, हाजापूर, हिवरगाव, डोंगरगाव या गावांना तिसऱ्या टप्प्यामधून नलिका निहाय क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.


या योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम यामध्ये पोहोच कालवा, पंपगृह, कळ यंत्र, नलिका व शेलेवाडी येथील गुरुत्वीय नलिका व त्यावरील वितरण व्यवस्था कामाची निविदा काढण्यास शासनाची मान्यता मिळाली असून पहिल्या टप्प्यातील सर्व तांत्रिक मान्यता घेऊन कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे या पहिल्या टप्पा क्रमांक एक अंतर्गत शेलेवाडी गुरुत्वीय नलिका द्वारे २०६८.७९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे तर उर्वरित टप्पा क्रमांक दोन व तीनच्या निविदा काढण्याची परवानगीचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आला आहे त्याला लवकरच तांत्रिक मान्यता मिळवून टप्पा दोन व तीन ची निविदाही तात्काळ काढून सर्व काम एकाच वेळी सुरू करणार असल्याचे यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले यावेळी मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांमधील पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते यामध्ये सभापती प्रदीप खांडेकर,खुपसंगी येथील जयराम आलदर,नंदेश्र्वर येथील अशोक चौंडे भारत गरंडे,आंधळगाव येथील सुरेश भाकरे, येड्रावचे चंद्रकांत गोडसे, लक्ष्मी दहिवडी येथील धनंजय पाटील यांचेसह भाजपचे जिल्हा संघटक शशिकांत चव्हाण तालुका अध्यक्ष अंबादास कुलकर्णी युवक जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव राजू पाटील,संजय पाटील,गावचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

# सोलापूर येथील आरक्षण जनजागरण रॅली सात आगस्ट २०२४ रोजी सोलापूर येथे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/ प्रतिनिधी : आरक्षण जनजागरण रॅली पंढरपूर शहर व तालुक्यातील मराठा समाजातील बंधू-भगिनींनी आपल्या मुलाबाळांना आरक्षण मिळवण्यासाठी सरकारी नोकरीमध्ये संधी मिळवण्यासाठी एक वर्ष सातत्याने आंदोलन करणारे संघर्ष योद्धा मनोज जणांनी पाटील हे सोलापुरात येणार आहेत तरी मराठा समाजातील बांधवांनी मराठा आरक्षण जनजागरण व शांतता रॅलीत उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी बुधवार दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी अकरा वाजता येत आहे

तरी मराठा समाजातील समाज बांधवांनी आपल्या कुटुंबासह लाखोच्या संख्येने उपस्थित दाखवून मराठा समाजाची ताकद दाखववावी तसेच शासनात मराठा समाजाचा आरक्षण देण्यास भाग पाडावे असे कळकळीची आव्हान सकल मराठा समाज संभाजी ब्रिगेड संघटना पंढरपूर शहर व तालुका यांच्या वतीने करण्यात येत आहे






# रॉबिन हूड आर्मी अक्कलकोटचा ७ वा वर्धापनदिन साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः रॉबिन हूड आर्मी अक्कलकोटच्या ७व्या वर्धापन दिनानिमित्त रॉबिन हूड आर्मी अक्कलकोटच्या टीम कडून झोपडपट्टी परिसरातील लहान मुलांना फळे व बिस्किट वाटप करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला.



मैत्री दिनानिमित्त अवचित साधून अक्कलकोट शहरात रॉबिन हूड आर्मी संस्था चालू,आज या संस्थेचे सात वर्ष पूर्ण होऊन आठव्या वर्षात पदार्पण झाले आहे. इवलेसे रोप लाविलिये दारी त्याचा वेल गेला गगनावरी. रॉबिनहूड आर्मी सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष हिंदुरावजी गोरे सर आणि रविकांत जनशक्ती यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट शहरात रॉबिनहूड आर्मी अक्कलकोट गेल्या सात वर्षापासून निस्वार्थ सेवा रॉबिनहूड आर्मीचे सदस्य काम करत आहेत.लोकांच्या सहवासात काम करत असताना बघता बघता सात वर्ष कसे उलटून गेले हे माहीतच झाले नाही.

रॉबिन हूड अक्कलकोटच्या माध्यमातून अक्कलकोट शहरातील अनेक गरजू बेगर मनोरुग्ण बेवारस अशा लोकांना अक्कलकोट शहरातील हॉटेल घरगुती कार्यक्रम लग्न समारंभ बर्थडे पार्टी आणि अन्य कोणतेही छोटे-मोठे कार्यक्रमात राहिलेला अन्न वाया न जाता गरजू लोकांपर्यंत पोहोचण्याचा काम रॉबिनहूड आर्मी अक्कलकोट च्या माध्यमातून केली जात आहे.रॉबिन हूड आर्मीचे रशिद खिस्तके, सोहेल फरास,समीर शेख, राम लोणारी,समर्थ घनाते यांनी अक्कलकोट शहरातील कित्येक बेवारस मनोरुग भिक्षू अशा अनेक लोकांचा उपचार सुद्धा करण्यात आला आहे व उपचारादरम्यान मृत्यू झाल्यास लोकांचा अंत्यविधी सुद्धा त्यांच्या परंपरेनुसार करण्यात आला आहे. आणि दोन बेवारस मृत्यूचा शोध काढून त्यांच्या परिवाराला सुपूर्त करण्यात आले आहे.

अक्कलकोट शहरात बेवारस मनोरुगणे भिक्षू अनोळखी व्यक्ती दवाखान्यात संदर्भ किंवा मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या अंत्यविधी संबंधी आम्हाला कॉल आल्यास तात्काळ त्या ठिकाणी जाऊन त्या इस्मान दवाखान्याची जरूरत असल्यास दवाखाना किंवा मृत्यू झाल्यास त्यांची अंत्यविधी करण्यासंबंधी सोहेल फरास माझे मित्र रशिद खिस्तके,समीर शेख यांनी उपस्थित असतात। माणूसकी हाच खरा धर्म मेल्यावर खांदा देण्यापेक्षा जिवंतपणी मदतीचा हात द्या!

**सोहेल फरास अक्कलकोट सामाजिक कार्यकर्ता**

रशिद खिस्तके,देविदास गवंडी,अनंत क्षीरसागर,सोहेल फरास,सरफराज कमानघर,समीर शेख,आशिष हुबे, योगेश महेंद्रकर,श्रीधर गुरव,आप्पा गवळी,मुन्ना आत्तार,शंकर कुराळे आयान खिस्तके,सोनू सुभेदार सचिन चव्हाण यल्लाशा घोडके,इरफ़ान सातलगाव,नूर मुल्ला बाबुशा भालके, हे सर्व आर्मीचे सदस्य निस्वार्थ सेवा करत आहेत...

# भीमा सेना व मान. नदीवर मोठे बंधारे (बरेजेस) बांधावे यासाठी ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे परिचारक यांची मागणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः कर्नाटकात वाहून जाते ते वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी नियोजन केल्यास डिसेंबर पर्यंत मोजणी वरती ताण येणार नाही व उजनीचे पाणी शिल्लक राहील याचा वापर रब्बी व उन्हाळी हंगामासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी करता येईल उजनी भरण्यासाठी येणारा अतिरिक्त पाण्याचा ताण कमी होईल यासाठी अंदाजे २५ टीएमसी पाणी अडवण्याचे एक लोक कर्म प्लॅन बसवून या कामाला गती दिल्यास पुढील काळातील अनेक वर्षाचा पाण्याचा प्रश्न निकाली निघेल भीमा सेना मान नदीवर बॅरेजेस बांधण्यात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पिण्याचा पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असून त्याचा मोठा फायदा होणार असून शेतकऱ्यांसाठी समाधानाचे वातावरण तयार होईल व भविष्यातील पाण्याची अडचण दूर होईल यावर उपमुख्यमंत्र्या फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे

२५ टीएमसी पाण्याची होणारी बचत भीमा सेना व मान नदीवर मोठे बंधारे (बेरी जेस) बांधून पाणी अडवण्यास पंचवीस टीएमसी पाण्याची बचत होणार असून त्यामुळे जिल्ह्यात पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल मदत होत असून याविषयी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बरोबर सविस्तर चर्चा केली व मुंबई येथे प्रशांत प्रचारक यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेऊन सोलापूर जिल्ह्याचा पाणी प्रश्नावर निवेदन दिले व भीमा सेना व मान नदीवर विविध ठिकाणी मोठे बंधारे अर्थात



बेरीज बांधल्यास पुराचे वाहून जाणारे पाणी अडवले जाणार असून त्याचा मोठा फायदा जिल्ह्यातील होणार आहे व याबाबत परिचारक यांनी गेल्या काही वर्षापासून वारंवार शासनाकडे मागणी करून धरली आहे मात्र याचा मोठा खर्च असल्यामुळे याबाबत शासन सकारात्मक असूनही कार्यवाही होत नाही यावर परिचारक यांनी शासनास सध्या भीमा नदीवर असणाऱ्या बंधाऱ्याचे रूपांतर मोठ्या बेरीज मध्ये करणे शक्य आहे का यावर चर्चा केली व सोलापूर जिल्ह्यातील भीमा सेना मान नदी काठच्या शेतकऱ्यांना यांचा मोठा फायदा होणार असून अंदाजे १५ ते २० टीएमसी पाणी पावसाचे दाजी पावसाळ्यामध्ये प्रत्येक वर्षी वीस ते तीस टीएमसी पाणी वाहून जाते हे पाणी वाहून जाण्यास जाऊ नये म्हणून बंधारे बांधल्यास या पाण्याचा येथील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल व तेवढे पाने उजनी धरणामध्ये शिल्लक राहील याचा फायदा सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे

# तलाठी व मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर, जिल्हाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

## मुख्यमंत्र्यांची लाडकी बहिण व शेतकरी. विद्यार्थी कागदपत्रांसाठी त्रस्त

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा /राहुल साबळे : जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील तलाठी यांच्या प्रस्तावित केलेल्या अन्यायकारक बदल्या रद्द करणे व इतर मागण्यासंर्दभात वविध प्रलंबित मागण्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. परंतु अद्यापही प्रशासनाने त्यांच्या आंदोलनाची दखल घेतली नाही. त्यामुळे तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी २९ जुलैपासून सामूहिक रजा आंदोलनाला सुरूवात केली असून . गावपातळीवरील महसुली कामे ठप्प झाले आहेत. तलाठी कार्यालय बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना लागणारे सातबारा आठ अ मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी हाणी होत आहे.लाडकी बहीण योजनेसाठी लागणाऱ्यां कागदपत्रातही मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होताना मुख्यमंत्री साहेबांची लाडकी बहिण परेशान होताना दिसत आहे.शैक्षणिक विद्यार्थ्यांला उत्पन्नाच्या दाखल्यासाठी तलाठी सामुहिक रजेवर असल्याने शैक्षणिक कागदपत्रांसाठी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थी शासनाच्या मानधनापासून वंचित राहण्याची वेळ येते कि काय असा प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनाशी उदभवत आहे .पिक कर्ज प्रकरणासाठी लागणारे . सातबारा फेरफार.इतर कागदपत्रं मिळत नसल्याने . शेतकरी त्रस्त झाले आहेत.शासनाचा सुरू असलेला महसुली पंधरवडा तलाठी व मंडळ अधिकारी नावापुरतेच उरलेकी काय असा सवाल संतप्त नागरिक करत आहेत.जिल्हाप्रशासना ला तलाठी व मंडळ अधिकारी यांनी निवेदन देऊन जिल्हा प्रशासन स्वस्त बसून बघ्याची भूमिका घेत असून त्यांनी या बाबत संघटनेच्या प्रतिनिधींना लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे चर्चेला बोलविले नसल्याची माहिती समोर आली आहे.त्यामुळे आंदोलन अधिक चिघळण्याची शक्यता असून जिल्हा प्रशासनाने तोडगा न काढल्यास सदर आंदोलनाची व्याप्ती विदर्भ पटवारी संघ नागपूर यांचे केंद्रीय अध्यक्ष बाळकृष्णजी गाढवे यांच्या नेतृत्वात संपूर्ण विदर्भात आंदोलन छेडण्याचा इशारा विदर्भ पटवारी संघ शाखा बुलढाणाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला देण्यात आला प्रशासनाने पटवारी मंडळी अधिकारी यांच्या विविध प्रलंबित मागण्या त्वरित मंजूर करावे.आंदोलनामुळे शैक्षणिक व शेती संबंधित कामे प्रभावित झाल्याने त्रस्त नागरिक व शेतकरी होत आहेत.



